# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 11/10/2021 (सोमवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :- अंतर्गत 19 कि. मी. अंतरावरील मौजा सातनवरी येथे 11/10/2021 चे 02.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे- आकाश जगन्नाथ वाकोडीकर वय 30 वर्ष रा. तांडापेठ पाचपावली नागपुर हा त्याचे तिन तित्र नामे आकाश मुरलीधर अडसुडे, सुमित रमेश नागदेवते व अश्वीन जगताप वाकोडीकर सर्व रा. नागपुर यांचे सह पांढऱ्या रंगाच्या स्वीप्ट कार क्र एमएच- 31/एफई- 5088 मध्ये बसुन अमरावती वरून एनएच 53 हायवे रोडने नागपुरकडे जात होते. त्यादरम्यान सातनवरी शिवाराजवळ फिर्यादी यांचे कारचा उजवे बाजूचा समोरचा टायर पंचर झाल्याने गाडी बाजूला उभी करून टायर बदलला परंतु गाडी चालू करून पाहली असता सुरू होत नव्हती. फिर्यादी याने तेथुन जाणाऱ्या अनोळखी कार चालकाचे मदतिने फिर्यादी व त्याचे तिन मित्र मिळुन पाठीमागुन धक्का मारून गाडी चालू करण्याचा प्रयत्न करीत असता अमरावती कडून नागपुरचे दिशेने भरधाव वेगाने जात असलेल्या अज्ञात ट्रक चालकाने फिर्यादी याच्या कारला पाठीमागुन जोरात धडक दिली. या अपघातात फिर्यादीचा मित्र नामे 1) आकाश मुरलीधर अडसुडे, वय 30 वर्ष रा. वाठोडा नागपूर याच्या मरणास व 2) अश्विन जगन्नाथ वाकोडीकर 3) सुमीत रमेश नागदेवे यांना गंभीर जखमी करण्यास आरोपी कारणीभुत ठरला व घटनास्थळावरून नागपुरच्या दिशेने पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि कदम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर